प्रेसनोट                                                    दि.01/10/2021

आर्थिक गुन्हे शाखा,मुंबई कक्ष–13,सी बी कंट्रोल यांनी कॅन्सर या आजारावरील 67,90,000/–रूपये किंमतीची बनावट औषंधे(ADCETRIS इंजेक्शन व ICLUSIG गोळ्या) बेकायदेशीररित्या विक्री करणाऱ्या महिलेस अटक केलेबाबत

| | |
|---|---|
| कक्ष | सी बी कंट्रोल, कक्ष–13, आर्थिक गुन्हे शाखा मुंबई |
| गु.र.क. व कलम | आ.गु.वि. गु.र.क 87/2021 कलम 420, 336, 483, 486,34 भादविसह कलम 51,63,65 कॉपी राईट ॲक्ट |
| गुन्हा दाखल दिंनाक | 30/9/21 रोजी 11.20 वाजता |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिंनाक 11/03/21 ते अदयाप पंर्यत |
| घटनास्थळ | एस व्ही रोड परिसर ,सांताक्रुझ पश्चिम |
| फिर्यादीचे नाव | ॲड गौरव अनिल गोगिया, प्रतिनिधी, **TAKEDA Pharmaceutical Ltd** |
| आरोपीची संख्या | एक महिला आरोपी वय 31 वर्षे |
| जप्त मुददेमाल व अंदाजे किंमत | रूपये 67,90,000/– किंमतीचे बनावट ॲन्टी कॅन्सर **"ADCETRIS** इंजेक्शन व **ICLUSIG** गोळया |

**गुन्हयाची थोडक्यात हकीगतः–**

**TAKEDA Pharmaceutical Ltd Add- Osaka Japan** हि कंपनी कॅन्सर या आजारावरील औषधाचे उत्पादन करते. **TAKEDA** या कंपनीने भारतामध्ये बनावटीकरणाबाबत कायदेशीर कारवाई करणेकरीता फिर्यादी यांच्या **United Overseas Trade Mark Company** या कंपनीस कायदेशीर अधिकार प्रदान केलेले आहेत. फिर्यादी यांना मुंबई व परिसरात **TAKEDA** या कंपनीचे ॲन्टी कॅन्सर औषध **ADCETRIS** इंजेक्शन व **ICLUSIG** गोळ्या हे विक्री करण्याकरीता परवानगी नसतानासुध्दा काही फार्मा कंपन्या सदरची औषधे बनावटीकरण करून बेकादेशिररित्या साठा करून ती विक्री करून रुग्णांच्या जिवीतास धोका निर्माण करीत असल्याची माहीती प्राप्त झाली होती. फिर्यादी यांनी केलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून आर्थिक गुन्हे शाखा, सी बी कंट्रोल यांच्याकडुन तपास चालु करण्यात आला.

दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान दिंनाक 30/9/2021 रोजी सी.बी कंट्रोल, आर्थिक गुन्हे विभाग मुंबई यांना गोपनीय माहीती प्राप्त झाली की, बनावट ॲन्टी कॅन्सर औषधे **ADCETRIS** इंजेक्शन व **ICLUSIG** या गोळ्या प्राईम हेल्थ प्रा.लि.ही कंपनी

बेकादेशीररित्या साठा करून, सदर बनावट औषधांची विक्री करीत आहे. सदरची बाब संवेदनशील व रूग्णांच्या जिवीतास धोका निर्माण करणारी असल्याने तात्काळ वरिष्ठांच्या परवानगीने सी. बी. कंट्रोलचे अधिकारी, अंमलदार व कंपनीचे प्रतिनिधी यांनी प्राईम हेल्थ प्रा. लि कपंनी, सी एस/40, मेट्रो प्लाझा, नेतवली नाका, कल्याण पुर्व येथे छापा टाकला असता अटक महिला हिचे ताब्यातुन **ADCETRIS** इंजेक्शन च्या 07 बॉटल किंमत प्रत्येकी 5,80,000/- व **ICLUSIG** या गोळंयाचे 02 बॉक्स किंमत प्रत्येकी 13,50,000/-रू, एक लॅपटॉप व मोबाईल फोन असा एकुण 67,90,000/- मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदरची औषधे हि बनावट असुन ती भारतामध्ये विक्रीस परवानगी नसतानासुध्दा विक्री करीताना मिळुन आल्याने महिलेस गुन्हयात अटक करण्यात आली.

सदरची कारवाई मा. पोलीस सह आयुक्त, अर्थिक गुन्हे शाखा मुंबई श्री निकेत कौशिक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्या नेतृत्वाखाली सपोनि रोहित सांवत, सपोनि अनिल जायकर, पोउनि रूपेश दरेकर, पोउनि एकनाथ देसाई, पो.ह.क्र 32352/नाईक, पो.ह.क्र 990230/जाधव पो.ह.क्र 960739/डोईफोडे, पो.ना.क्र 980714/वलेकर, पो.ना.01887/दरेकर, पो.ना.क्र. 03916/भंडारी, पो.ना.क्र. 041073/यादव, पो.शि.क 142428 कुंभार, पो.शि.क्र. 150583/शेंडगे, म.पो.शि.क्र. 171842/राऊत, म.पो.शि.क्र. 171931/गिरी पो.ना चा.980782/ पोळ यांनी पार पाडली असुन गुन्हयाचा पुढील तपास मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि रोहित सांवत हे करीत आहेत.

--------